ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - I January - March - 2021

ENGLISH / MARATHI / HINDI

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Aundh, Pune-67

127

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, 7030308239 Ph. No. : (0240) 2400877
E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399** (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | आत्मनिर्भर भारतासाठी अंगणवाडी मधील बालकांचे पोषण दर्जाचे अध्ययन<br>**डॉ. मंजिरी मि. चेपे** | ५८-६३ |
| १४ | २१व्या शतकातील आत्मनिर्भर भारत<br>**डॉ. आशा दादासाहेब कदम** | ६४-६८ |
| १५ | भारतीय कृषी आणि संबंधित उद्योग यांचा कोरोना काळातील थोडक्यात आढावा<br>**डॉ. दिवाकर धोंडू कदम** | ६९-७२ |
| १६ | आत्मनिर्भर भारतासाठी मानसशास्त्रज्ञांची भूमिका<br>**श्री नरोटे गोरक्ष लक्ष्मण** | ७३-७७ |
| १७ | आत्मनिर्भर भारत आणि शेती व ग्रामीण विकास<br>**प्रा. नलिनी पाचर्णे** | ७८-८३ |
| १८ | आत्मनिर्भर भारत म्हणजेच स्वावलंबन<br>**प्रा. डॉ. शुभांगी सुभाष दांगट** | ८४-८५ |
| १९ | आत्मनिर्भर भारत आणि भारतीय शेती<br>**डॉ. प्रमोदिनी विठ्ठल कदम** | ८६-८९ |
| २० | जागतिकीकरण आणि भारतीय कृषी<br>**डॉ. प्रशांत काशिनाथ लभाने** | ९०-९४ |
| २१ | आत्मनिर्भर भारत : योजना व नियोजन<br>**प्राचार्य डॉ. संजीव लाटे** | ९५-१०१ |
| २२ | आत्मनिर्भर भारत अभियानाचा चिकित्सक अभ्यास<br>**घोलप के. एस.**<br>**डॉ. देसाई व्ही. आर.**<br>**डॉ. लामदाडे बी. बी.** | १०२-१०७ |
| २३ | स्वावलंबी भारतात ग्रामीण विपनातील समस्या व आव्हाने<br>**डॉ. मारुती अर्जुन केकाणे** | १०८-११४ |
| २४ | ऑनलाईन राष्ट्रीय कृषी बाजार (e-NAM) : एक आढावा<br>**प्रा. रामदास गादगे** | ११५-११९ |





Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

129

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २५ | शेतीची भुमिका व आत्मनिर्भर भारत योजनेद्वारे शेती संबंधित केलेल्या तरतुदी<br>**मारुती भिमराव कांबळे**<br>**डॉ. मिनाक्षी जाधव** | १२०-१२४ |
| २६ | कोरोना कालखंडातील स्त्री-पुरुषांमधील ताण-तणावातील फरक अभ्यासणे व त्यांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी उपाययोजना सुचविणे<br>**अडसरे विष्णू बाळशिराम** | १२५-१२७ |
| २७ | महात्मा गांधी यांची ग्राम स्वराज्य संकल्पना आणि आत्मनिर्भर भारत<br>**प्रा. सांगळे भाऊसाहेब खंडू** | १२८-१३० |
| २८ | आत्मनिर्भर भारत या संकल्पनेसंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनातून लावलेला अन्वयार्थ एक अभ्यास<br>**विजयकुमार वावळे** | १३१-१३४ |
| २९ | आत्मनिर्भर भारत, वस्तुस्थिती, संधी आणि आव्हाने<br>**प्रा. डॉ. सीमा चव्हाण**<br>**विकास गोधाजी अंत्रे** | १३५-१४१ |


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *



130

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# १७. आत्मनिर्भर भारत आणि शेती व ग्रामीण विकास

**प्रा. नलिनी पाचर्णे**
अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध, पुणे.

## प्रास्ताविक

कोविड 19 विषाणूंमुळे होणाऱ्या संसर्गजन्य महामारी मुळे झालेली प्रचंड मनुष्यहानी ही जगाच्या इतिहासातील महत्त्वाचे नोंद ठरते. सप्टेंबर 2019 मध्ये चीनमध्ये सुरू झालेल्या या संसर्गजन्य आजाराने जगातील विविध देशात थैमान घातले. अमेरिका, इटली, फ्रान्स, ब्रिटन स्पेन, जर्मनी, भारत, चीन इत्यादी विविध देशात कोरोना व्हायरस प्रादुर्भावाने मोठ्या प्रमाणात लोक मृत्युमुखी पडले. विषाणूंचे संक्रमण रोखण्यासाठी सरकारने संचारबंदी लागू केली. या काळात उद्योग, व्यवसाय, व्यापार, व्यवहार पूर्ण बंद ठेवल्यामुळे त्याचे अनिष्ट परिणाम उत्पादन, रोजगार, गुंतवणूक इत्यादी वरती होऊन जनजीवन विस्कळीत झाले. अर्थव्यवस्था कोलमडली. रोजीरोटीसाठी शहरांमध्ये राहणाऱ्या लोकांना रोजगार गेल्यामुळे परत गावी जाताना हाल-अपेष्टा सहन कराव्या लागल्या. समाजामध्ये असुरक्षितता व भीतीचे वातावरण निर्माण झाले . देशाचे उपभोग्य तसेच विकास आवश्यक आयातीवरील अवलंबित्व धोक्याचे असल्याचा प्रत्यय आला. भारतीय अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी, जनजीवन सुरळीत होण्यासाठी भारत सरकारने 12 मे ते 19 मे 2020 या कालावधीत 20 लाख कोटी रुपयांचे आर्थिक पॅकेज ची घोषणा केली. तिस-या हप्ता मध्ये शेती आणि शेतीपूरक व्यवसायासाठी आर्थिक तरतुदी घोषित केल्या. आत्मनिर्भरते साठी स्वयंपूर्णतेवर भर देण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदीजीं चे भाषण अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी आणि आर्थिक विकासाला योग्य दिशा देण्याच्या दृष्टिकोनातून धाडसी निर्णय म्हणून महत्त्वाचे ठरले. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतीय शेती व ग्रामीण विकासासाठी आत्मनिर्भर भारत योजनेमध्ये केलेल्या तरतुदींचा आढावा घेतलेला आहे.

## उद्दिष्टे

१. भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीचे स्थान समजून घेणे
२. भारतीय अर्थव्यवस्थे पुढील आव्हाने समजून घेणे
३. आत्मनिर्भर भारतासाठी कृषी आणि ग्रामीण विकासासाठी सरकारच्या आर्थिक तरतुदींचा आढावा घेणे.



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67

131

**सामग्री संकलन**

हा शोधनिबंध दुय्यम सामग्री वर आधारित असून वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालिके, संदर्भपुस्तके, आणि इंटरनेटच्या आधारे आवश्यक माहिती व आकडेवारी चे संकलन केले आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थे पुढील आव्हाने**

भारतीय अर्थव्यवस्था वेगाने विकसित होणारी पाचव्या क्रमांकाची संमिश्र विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. 2014-15 ते 2017-18 या काळात देशाचा सरासरी वार्षिक वृद्धी दर 7% होता. 2018-19 मध्ये देशातील दरडोई उत्पन्न 2119 डॉलर होते. याबाबत भारत जगात 142 व्या क्रमांकावर आहे.

1991 पासून च्या आर्थिक स्थिरीकरण व संरचनात्मक सुधारणा काळातील उपाययोजनांमुळे लोकांची खरेदी शक्ती व एकूण मागणीत वाढ झाली. उत्पादन प्रक्रिया गतिमान झाली. भांडवल गुंतवणूक व कर महसुलाचे प्रमाण वाढले. आर्थिक व्यवहार पातळी वाढली. विकासाला गती मिळाली. तरीसुद्धा भारतीय अर्थव्यवस्थेतील मूलभूत प्रश्न समाधानकारकपणे सोडवता आले नाहीत. अर्थव्यवस्थेपुढील समस्या या चिंताजनक आहेत.

**अतिरिक्त लोकसंख्या वाढ**

1951 मध्ये भारताची लोकसंख्या 36.1 कोटी होती 2019 मध्ये ही लोकसंख्या जवळपास 136 कोटी पर्यंत वाढली आहे. जगाच्या भौगोलिक क्षेत्रफळाचा 2.4 टक्के भारताचे क्षेत्रफळ आहे जागतिक लोकसंख्येपैकी 17.7 टक्के लोकसंख्या भारतात राहते. गरीबी बेकारी, भाववाढ, आर्थिक विषमता या अनेक समस्यांचे मूळ अतिरिक्त लोकसंख्या आहे.

आर्थिक विषमता, उत्कृष्ट शैक्षणिक व आरोग्य सुविधांची कमतरता, आधारभूत सुविधांची कमतरता, कमी दरडोई उत्पन्न इत्यादी समस्या गंभीर आहेत

**भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीचे स्थान**

शेती हा भारतातील पुरातन व्यवसाय असून 65 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.

- भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात मध्ये शेतीचा वाटा 2018 -19 मध्ये 15.8 टक्के होता प्रगत देशात हे प्रमाण 2 ते 5 टक्के आढळते.



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

- भारतात एकूण श्रमशक्ती पैकी 54 .6 टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे रोजगारासाठी शेतीवर अवलंबून आहे प्रगत देशात हे प्रमाण 2 ते 7 टक्के आढळते.
- शेतीव्यवसाय औद्योगिक विकासाचा आधार आहे. साखर, कापड, तंबाखू ,फळ प्रक्रिया, ,डाळ मिल्स इत्यादी प्रक्रिया उद्योग शेतीवर आधारित आहेत.
- आंतरराष्ट्रीय व्यापारात शेती क्षेत्राचे योगदान महत्त्वाचे आहे. भारतातून चहा-कॉफी फळे-भाजीपाला तंबाखू, साखर, तांदूळ, कापड, चामड्याच्या वस्तू इत्यादींची निर्यात होते आणि दुर्मिळ परकीय चलन मिळते.
- शेती क्षेत्रामुळे वाहतूक, दळणवळण आणि व्यापाराला मदत होते, वाहतूक व व्यापाराचा शेतीक्षेत्र आधार आहे.
- अन्नधान्य उत्पादन ही समाजाची मूलभूत गरज आहे. देशातील लोकांना लागणारे अन्नधान्य उत्पादन करणारे क्षेत्र म्हणून शेती महत्वाची आहे.
- पशुधनासाठी चारा शेतीतून मिळतो. पशुधना बाबत भारत जगात प्रथम क्रमांकावर आहे. जगाच्या पशुधनाच्या 17 टक्के पशुधन भारतात आहे.
- भारतीय शेती सरकारच्या महसुलाचे महत्त्वाचे साधन आहे.
- कृषी विकासावर बँकिंग, वाहतूक, दळणवळण इत्यादींचा विकास आधारित असतो.
- राजकीय आणि सामाजिक बदलांच्या दृष्टिकोनातून शेती क्षेत्राची भूमिका महत्त्वाची ठरते.
- शेती व्यवसाय सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणारा मानला जातो.

**आत्मनिर्भर भारत आणि शेती व ग्रामीण विकास**

कृषिप्रधान भारताच्या संदर्भात शेतीचा विकास म्हणजे ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकास म्हणजे देशाचा आर्थिक विकास हे समीकरण बनले आहे.प्रस्थापित मोदी सरकारने करोना प्रादुर्भावामुळे विस्कळीत अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी 20 लाख कोटी रुपयांच्या आर्थिक पॅकेज - तिसऱ्या हप्त्याची घोषणा केली. भारताच्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी याबाबत सूतोवाच केले. त्यामध्ये शेती पूरक व्यवसाय, शेती संबंधित पायाभूत सुविधा इत्यादींसाठी च्या तरतुदी केलेल्या आहेत. सरकारने शेतीसाठीच्या पायाभूत सुविधांसाठी एक लाख कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. शेतमालावर प्रक्रिया करणारे छोटे उद्योग, मासेमारी, पशुपालन, मधुमक्षिका पालन ,कोल्डस्टोरेज, लॉजिस्टिक, डेअरी उद्योग, औषधी शेतीला प्रोत्साहन पशुधनासाठी लसीकरण इत्यादी विविध घटकांसाठी आर्थिक तरतुदी केलेल्या आहेत. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी यावेळी शेतीशी निगडित पायाभूत सुविधा तसेच शेतमालाला योग्य भाव



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

133

मिळण्यासाठी कायदेशीर सुधारणा शेतमालाची निगडीत जीवनावश्यक वस्तू कायद्यात सुधारणा करण्याबाबत करण्याबाबत घोषणा केली यावेळी केंद्रीय अर्थ मंत्र्यांनी एकूण अकरा महत्त्वाच्या घोषणा केलेल्या आहेत.

**1. शेती संबंधित पायाभूत सुविधांसाठी 1 लाख कोटी रुपयांच्या योजना:** शेती संबंधित पायाभूत सुविधांचा दर्जा आणि व्याप्ती वाढविण्यासाठी सरकार लक्ष केंद्रित करणार आहे शेतमाल साठवणक्षमता लॉजिस्टिक गोल्ड चेन प्राथमिक शेती संस्था, कृषी संस्था, स्टार्टअप इत्यादीसाठी तरतुदी केलेल्या आहेत.

**Farm to Gate** (शेती ते ग्राहक) अशी सुसूत्र आणि सुसज्ज पायाभूत सुविधांची साखळी उभारण्यासाठी व ते सक्षम करण्यासाठी एक लाख कोटी रुपयांचे इन्फ्रास्ट्रक्चर फोनची घोषणा केली आहे.

सूक्ष्म कृषी उद्योग संघटित क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे विकसित करण्यासाठी **10,000** कोटी रुपयांची योजना आखण्यात आली. नाशवंत कृषी उत्पादने भाजीपाला, फळे, फळ भाज्या, कांदे, बटाटे,, टोमॅटो, लसूण इत्यादींसाठी **operation green** ही योजना आहे. त्यासाठी पाचशे कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. **50** टक्के अनुदान वाहतूक आणि **50** टक्के अनुदान **cold storage, warehouses** यासाठीच्या खर्चासाठी देण्याची तरतूद आहे.

कृषी उत्पादन क्षेत्र खऱ्या अर्थाने मुक्त आणि सर्वार्थाने समृद्ध करण्यासाठी अनेक क्रांतिकारी आणि धोरणात्मक निर्णय आत्मनिर्भर भारत योजनेमध्ये घेण्यात आले आहेत.

शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या छोट्या उद्योगांसाठी: विविध राज्यात स्थानिक पिक रचनेनुसार **cluster** तयार केले जाणार. **Organic** आणि **Herbal** उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टिकोनातून पोषक आणि आरोग्यदायी अशा उत्पादनाला प्रोत्साहन देण्याची तरतूद आहे. त्याचा लाभ **20** लाख लहान फुड प्रोसेसिंग कंपन्यांना होणार. त्यासाठी दहा हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

**3.** पंतप्रधान मत्स्य संपदा योजनेअंतर्गत मासेमारी व्यवसाय व पायाभूत सुविधांसाठी **20** हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यामुळे पुढील पाच वर्षात मत्स्य उत्पादन **70** लाख टनांपर्यंत वाढवण्याचे लक्ष आहे.

**4. पशुपालन व दुग्ध व्यवसाय साठी तरतूद:** भारतामध्ये शेतीसाठी जोडधंदा म्हणून पशुपालन आणि दुग्ध व्यवसायाला महत्त्वाचे स्थान आहे. आज देशात **53** कोटी एवढी पशुधन संख्या असून भारत दूध उत्पादनाबाबत प्रथम क्रमांकावर आहे. दूध उत्पादनाला चालना देण्यासाठी डेअरीशी निगडीत आणि पशुपालन अशा पायाभूत सुविधांसाठी तरतूद आत्मनिर्भर भारत योजनेमध्ये करण्यात आली आहे

आत्मनिर्भर भारत योजनेमध्ये **15** हजार कोटी रुपयांची तरतूद डेअरी व्यवसायासाठी आणि पशुपालन व्यवसायासाठी निगडित पायाभूत सुविधांसाठी केली जाणार आहे. दुध उत्पादनात वाड अणि



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67
134

प्रक्रियेसाठी उत्तेजन देणे हा मुख्य उद्देश आहे. पशुखाद्य उत्पादन करणाऱ्या व्यवसायांना प्रोत्साहन देण्याचा देण्याचा प्रयत्न आहे.पशुपालन दुग्ध व्यवसाय आणि दुधाच्या पदार्थांचे उत्पादन या उद्योगांमध्ये मूल्यवर्धनाची आणि रोजगार निर्मितीची प्रचंड क्षमता आहे सहकारी दूध संघांना **2%** प्रतिवर्षी व्याज स देण्यासाठी तरतूद केलेली आहे

**5. पशुपालनासाठी लसीकरण** योजनाः राष्ट्रीय पशु रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पशुधन शेळ्या-मेंढ्या आणि वराह यांचे **100%** लसीकरण हे उद्दिष्ट निश्चित केले आहे. **1.5** कोटी गाई आणि म्हशीचे लसीकरण आतापर्यंत पूर्ण झालेले आहे. माऊथ डिसीज उच्चाटनासाठी **13343** कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**6. औषधी वनस्पती शेतीला प्रोत्साहन:** आत्मनिर्भर भारत योजनेमध्ये औषधी वनस्पतींच्या उत्पादनासाठी **4000** कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. गंगा नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर औषधी आणि हर्बल वनस्पतींच्या शेतीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. दहा लाख हेक्टर मध्ये या प्रकारची शेती करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवलेले आहे.

**7. मधुमक्षिका पालन योजनेसाठी तरतूद :** मध उत्पादनात वाढ करण्यासाठी आत्मनिर्भर भारत योजनेमध्ये **500** कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**8. टॉप टू टोटल योजना :** शेती उत्पादन हे हंगामी असते मोठ्या प्रमाणात बाजारात शेतमालाची आवक झाल्यास मागणी तेवढी नसेल तर नाशवंत शेतमाल खराब होतो भारतामध्ये खूप कमी शेतमालावर प्रक्रिया केली जाते .शेतमाल विक्री व्यवस्था सक्षम करण्यासाठी तसेच नाशवंत पिकांसाठी **cold storage** ,शेतीमालावरील प्रक्रिया, शेतमालाची वाहतूक इत्यादी साठी शेतकऱ्यांना सबसिडी देण्यात येणार आहे. **50** टक्के सबसिडी मालवाहतुकीसाठी आणि **50** टक्के सबसिडी शेतमाल साठवण्यासाठी देण्यात येणार आहे.

**9. जीवनावश्यक वस्तू कायदा फक्त आपत्कालीन स्थितीत लागू राहणार :** कृषी क्षेत्रावर दूरगामी सकारात्मक परिणाम करतील असे क्रांतिकारी व धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत .कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतमाल विक्री बाबत सक्ती असणार नाही. त्यासाठी **'Farms produce trade and commerce (promotion and facilitation )ordinance 2020"**हा अध्यादेश राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर प्रत्यक्षात आला. अत्यावश्यक वस्तू कायद्यातून धान्ये ,डाळी ,खाद्यतेल ,कांदे, तेलबिया इत्यादी वगळण्यात आले आहेत.या कायद्यामुळे या वस्तूंचा योग्य साठा करणे शक्य होईल तसेच किरकोळ बाजारातील किमतीतील चढ-उतार कमी होतील.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *



135

कंत्राटी शेती मुळे शेतकऱ्यांना भावाची हमी व ग्राहकांची हमी मिळते तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे लोकांचे नुकसान झाल्यास् कंपनी शेतकऱ्यांच्या जमिनीचा ताबा घेऊ शकणार नाही अशी तरतूद केल्यामुळे शेतकऱ्यांना संरक्षण मिळेल. त्यासाठी Farms empowerment and protection Agreement and price insurance and farm services ordinance 2020 राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर कार्यान्वित झाला.

**समारोप**

कृषी क्षेत्र हे सर्वाधिक अनिश्चितता आणि धोके असणारे क्षेत्र आहे कारण ते निसर्गावर आधारित आहे इतर व्यवसायांच्या मानाने कमी शिक्षण असलेले कौशल्याचा अभाव व वैज्ञानिक दृष्टिकोण नसणाऱ्यांनी या क्षेत्रात भर असते ग्रामीण भागात प्राबल्य असणाऱ्या कृषी व्यवसायांना ग्रामीण जनतेला आधार देण्यासाठी स्वातंत्र्यानंतर त्याकाळात केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी विविध विकास योजना सुरू केलेल्या आजही शेती पूरक व्यवसाय, वने, सामाजिक न्याय शिक्षण, आरोग्य अशा विविध ते पंचवीस विभागांच्या वतीने जवळ जवळ 20 विकास योजना कार्यरत आहेत. करोना विषाणू प्रादुर्भावामुळे लॉक डाऊनच्या काळात विस्कळीत झालेली सामाजिक स्थिती व अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठ सरकारने भरीव तरतुदी केलेल्या आहेत.

**संदर्भ सूची**


- अर्थसंवाद -जानेवारी ते मार्च
- 2015, /खंडा 38 /अंक 4
- योजना-नोव्हेंबर 2018/अंक 4
- www.vikaspedia.in
- www. esakal.com
- www.deshdoot.com
- प्रा. डॉ. एस.व्ही. ढमढेरे ,भारतीय आर्थिक पर्यावरण ,
- जुलै २०१९ डायमंड पब्लिकेशन्स


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *